## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

आ.क्र.प्रसिध्दी-५१६
दिनांक: १८/७/२०२२

### - कोटेशन दरपत्रक -

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका प्रसिध्दी विभाग सन २०२२-२०२३ या आर्थीक वर्षाकरीता मनपाचे उपक्रम, जनहितार्थ आवाहने, निवेदने जाहिरात पट्टी व स्पॉट जाहिरात स्वरुपात देण्याकरीता स्थानिक केबलधारक यांचेकडून कोटेशन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | मालाचे / साहित्याचे वर्णन | जाहिरातीचा दर प्रकार |
|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील मनपाचे उपक्रम, जनहितार्थ आवाहने, निवेदने जाहिरात पट्टी व स्पॉट जाहिरात स्वरुपात प्रसिध्द करणे. | जाहिरात पट्टीचा प्रति तास, प्रति दिवस तसेच स्पॉट जाहिरातीचा प्रति तास, प्रति दिवस वेगवेगळा दर नमूद करावा. |

१) सन २०२२-२०२३ या कालावधीत महानगरपालिकेच्या निर्देशानुसार जाहिराती प्रसिध्द कराव्या लागतील.

२) शॉपअॅक्ट परवाना, जीएसटी क्रमांक व पॅन क्रमांक असणे आवश्यक आहे. त्याशिवाय बीलाची रक्कम अदा केली जाणार नाही.

३) प्रत्येक जाहिरातीच्या सीडी मनपाच्या प्रसिध्दी विभागात जमा कराव्या लागतील. जाहिरात पट्टी व स्पॉट जाहिरातीचा वरीलप्रमाणे वेगवेगळा दर नमूद करावा.

४) पुरवठादाराचे देयक फक्त इसीएस/एनईएफटी द्वारेच प्रदान करण्यात येईल. त्यासाठी संबंधीत पुरवठादाराने कोअर बँकींगची सुविधा असलेल्या बँकेतच खाते असणे बंधनकारक राहील.

५) पुढील आर्थिक वर्षाचे दर मंजूर होईपर्यंत सन २०२२-२०२३ च्याच दराने पुढील काम करावे लागेल.

६) केबलवर जाहिरात प्रसिध्दीस विलंब झाल्यास व ही गोष्ट ३ वेळा घडल्यास कुठल्याही प्रकारची पुर्व सूचना न देता कार्यारंभ आदेश रद्द केला जाईल.

७) दरपत्रके मंजूर झाल्यास महानगरपालिकेत अनामत रक्कम रुपये ५०००/- भरावे लागतील व ही रक्कम दरपत्रकांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत करण्यात येईल. तसेच नियमांचा भंग झाल्यास अथवा कोणत्याही कारणाने टेंडर रद्द झाल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल. अनामत रक्कम मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका या नावाने राष्ट्रीयकृत बँकेच्या डी.डी.च्या स्वरुपात स्विकारली जाईल.

८) दरपत्रक मंजूर झाल्यास ५०० रुपयांच्या मुद्रांकावर करारनामा करुन द्यावा लागेल.

९) अनामत रक्कम जमा करुन करारनामा करुन दिल्यानंतर कार्यारंभ आदेश दिला जाईल.

१०) जाहिरात प्रसिध्द केल्याचे बीले प्रत्येक महिन्याला सादर करावीत.

११) प्रसिध्दी अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करावी.

९२९
संगणक आवक - १८/७/२२

[signature] कोटरे

१२) निविदा स्विकारणे अथवा नाकारणे बाबत संपूर्ण हक्क महानगरपालिका आयुक्त यांचेकडे राखून ठेवण्यांत आले आहेत.

सदरबाबतचे दरपत्रक सिलबंद पाकीटात दि.२८/७/2022रोजी ५.०० वाजेपर्यंत प्र.प्रसिध्दी अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस समक्ष दाखल करावेत. दि. १८/७/2022

प्र.प्रसिध्दी अधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त (कर),
अहमदनगर महानगरपालिका

उपायुक्त (कर),
अहमदनगर महानगरपालिका

प्रत : संगणक विभाग प्रमुख, अहमदनगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर नोटीस मनपा अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

प्रत : हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर नोटीस मनपा नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी.